मटा 15 जुलै 2019

# विद्यार्थ्यांनी केली स्वच्छता

कोल्हापूर टाइम्स टीम

महापालिकेने सलग बाराव्या रविवारी स्वच्छता मोहीम राबवली. या मोहिमेत शहर स्वच्छतेसाठी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत स्वच्छतेची प्रतिज्ञा घेतली. एनसीसी, एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी आपल्यातील शिस्तीचे दर्शनही घडविले. शहाजी आणि कमला कॉलेज कॅम्पसमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पाच डंपर कचरा संकलीत करण्यात आला.

जयंती नाला संप व पंप हाउस येथे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी स्वच्छतेची विद्यार्थी व उपस्थितींना शपथ देऊन मोहिमेला सुरुवात केली.

## पाच डंपर कचरा संकलित; कॉलेजांत वृक्षारोपण

रविवारच्या स्वच्छता मोहिमेमध्ये एनसीसी व एनएसएस विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शहाजी कॉलेजच्या कॅम्पसची स्वच्छता करून वृक्षारोपण करण्यात आले. कमला कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी राजारामपुरी परिसराची स्वच्छता केली. त्यानंतर कॉलेज कॅम्पसमध्ये वृक्षारोपण केले. स्वच्छता मोहिमेत १६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी विल्सन पूल लक्ष्मीपुरी, सावित्रीबाई फुले हॉस्पिटल व रिलायन्स मॉल पिछाडीस आणि रंकाळा तलावाच्या दोन्ही बाजूला स्वच्छता करून वृक्षारोपण केले. पाच डंपर कचरा गोळा करुन सरवळीमध्ये टाकण्यात आला. उपायुक्त मंगेश शिंदे, सहाय्यक आयुक्त संजय सरनाईक, केएमसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश गवळी, शहाजी कॉलेजचे प्राचार्य आर. के. शानेदिवाण, कमला कॉलेजच्या प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, अनिल घस्ते, डॉ. सुजय पाटील, प्रा. रेखा पंडीत, वर्षा साठे, रोटरी क्लबचे गिरीश जोशी, आर्किटेक्ट असोसिएशनचे अध्यक्ष अजय कोराणे यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.



रविवारी महापालिकेच्यावतीने राबवलेल्या स्वच्छता मोहिमेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.